प्रकरण पाचवे

# उपसंहार

# उपसंहार

---

**'शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील दलित चळवळीचे चित्रण'** या विषयावरील अभ्यासाच्या अनुषंगाने काही निष्कर्ष मांडता येतात. साहित्य आणि समाज यांचा निकटचा संबंध आसतो. साहित्यात समाजाचे प्रतिबिंब उमटलेले असते. साहित्याचा विविध अंगाने अभ्यास केला जातो. समीक्षक विविध समीक्षा पद्धतीतून साहित्याची समीक्षा करतात. आपण विशिष्ट काळातील युगमानस, सामाजिक प्रेरणा, प्रवृत्तीची माहिती घेण्यासाठी सामाजिक अंगाने साहित्याचा अभ्यास करतो. सामाजिक अंगाने दलित कादंबरीचा अभ्यास केला असता वर्तमानकाळातील सामाजिक घटना व विविध चळवळींचे प्रतिबिंब कादंबरीत उमटलेले दिसून येते. हे प्रतिबिंब काही वेळा धुसर तर काही वेळा गडद होताना दिसते. या चळवळी साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन किंवा समाजजागृती करताना दिसून येतात. या प्रबंधिकेत आरंभी दलित चळवळीचा अभ्यास मांडण्यात आला आहे.

प्रस्तुत प्रबंधिकेतील **'दलित कादंबरी आणि दलित चळवळ'** या पहिल्या प्रकरणात चळवळ म्हणजे काय? हे सांगून विविध चळवळींचा आढावा घेतला आहे. 'चळवळ म्हणजे एखादे उद्दिष्ट घेवून ते साध्य करण्यासाठी किंवा सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक घटकांमध्ये परिवर्तन करण्यासाठी आपल्या उद्दिष्टानुरूप दिलेला लढा होय'. चळवळ ही विधायक बदल घडवून आणण्यासाठी चालविली जाते. ज्यावेळी प्रचलित समाजव्यवस्थेत समस्या जाणवतात त्यावेळी ती समाजव्यवस्था बदालण्यासाठी चळवळ निर्माण होते. अशा प्रकारच्या जागतिक, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील चळवळींचा आढावा घेऊन महाराष्ट्रातील दलित चळवळीची स्थिती-गती शोधण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक पातळीवर नागरी हक्क चळवळ, मार्क्सवादी चळवळ, स्त्रीहक्क चळवळ, अलिप्त राष्ट्र चळवळ या चळवळी प्रमुख्याने आढळतात.

राष्ट्रीय पातळीवर सत्नामी चळवळ, आदिवासी चळवळ, चंडाळांची चळवळ, शेतकरी चळवळ या चळवळी दिसून येतात. तर राज्य पातळीवर तर्खडकरांची समाज सुधारणा, प्रार्थना समाजाची चळवळ, सत्यशोधक चळवळ, ब्राम्हणेत्तर चळवळ, मुस्लिम सत्यशोधक चळवळ या चळवळींचा शोध घेता येतो.

१९ व्या शतकातील समाज प्रबोधनाच्या चळवळीने महाराष्ट्रात प्रबोधनाचा पाया घातला. महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे, राजर्षी शाहू महाराज यांनी दलित चळवळीसाठी विशेष योगदान दिले. महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीमधून प्रेरणा घेऊन इ.स.१८८८ पासून गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागु बनसोडे, विठोबा रावजी मुनपांडे इत्यादी दलित नेत्यांनी डॉ.आंबेडकरांपूर्वी दलित चळवळ कार्यान्वित केल्याचे आढळते. ही चळवळ एकसंघ नव्हती, ती विविध विभागात विभागलेली होती. सर्वाचे ध्येय मात्र समान होते.त्यांनी अस्पृश्यांना अस्पृश्यतेची जाणीव करून देणे, सामाजिक अनिष्ट प्रथा नाहीशा करणे, शिक्षणाविषयीचे महत्त्व पटवून देणे, संघटितपणा निर्माण करणे, रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे ध्येय ठेवून डॉ.आंबेडकरपूर्व दलित चळवळ कार्यरत असलेली दिसून येते. हिंदू धर्माच्या मानसिकतेत बदल करून दलितांना समान हक्क व न्याय मिळू शकेल असा आशावाद या नेत्यांना होता. त्यामुळे त्यांनी तीव्र आंदोलने केली नाहीत. आपल्या समाजाला सुधारण्यासाठी शिक्षणाचा आग्रह धरला, नवीन शाळा आणि वसतिगृहे सुरू केली. या चळवळीने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीसाठी पार्श्वभूमी तयार केली हे मान्य करावे लागते.

१९२० पासून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मानवमुक्तीचा लढा सुरू केला. अस्पृश्य समाजालाही सवर्णाप्रमाणे मूलभूत हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापली. महाडचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन, मंदिर प्रवेशाचे लढे उभारून दलितांना स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये मिळवून देण्यासाठी संघर्ष केलेला पहावयास मिळातो. त्यांनी दलितांना सामाजिक व राजकीय हक्क मिळविण्यासाठी

गोलमेज परिषदेत दलितांची बाजू मांडली. दलितांना राजकीय हक्क मिळविण्यासाठी 'शेडयुल्ड कास्ट फेडरेशनची" स्थापना केली. 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' या नियतकालिकातून लोकजागृती केली. लोकशाही समाजमूलक राज्यघटना बनविली. शेवटी वर्णव्यवस्थेने गुलाम बनविलेल्या हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धम्माचा स्वीकार केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीमुळे दलितांना आत्मभान प्राप्त झाले. अन्यायाविरूद्ध पेटून उठण्याची जाणीव त्यांच्यामध्ये निर्माण झाली.

डॉ.बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर दलित पुढाऱ्यांनी एकत्रित येवून 'रिपब्लिकन पक्षाची' स्थापना केली. पण गटबाजीमुळे दलित तरूणांमध्ये प्रक्षोभ निर्माण झाला व त्यामधून 'दलित पँथर' या संघटनेचा उदय झाला. दलित पँथर या संघटनेने दलितांमध्ये नवचेतना निर्माण केली. मराठावाडा विद्यापीठाचा नामांतर लढा, मंडल आयोगाच्या समर्थनार्थ दिलेला लढा, हे पँथर चळवळीतील उल्लेखनीय लढे आहेत. पँथर काळात दलित साहित्यही मोठया प्रमाणात निर्माण झाले. पण या चळवळीला पुढील काळात गटबाजीचा रोग लागला. त्यामुळे दलित चळवळीमध्ये साचलेपणा निर्मा झाला.

दलित चळवळीमधून दलित साहित्याची निर्मिती झालेली आहे त्यामुळे दलित कांबरीत चळवळीविषयक चित्रण अपरिहार्यपणे येते. काही दलित कादंबरीकारांनी आपल्या कादंबरीत दलित चळवळीची मांडणी केली आहे. बा.ग.हाटे, मुरलीधर जाधव, जयप्रकाश गवळे, भीमसेन देठे, विजय सिरसाट, जी.के.ऐनापुरे, बाबुराव गायकवाड यांनी दलित चळवळीमधील काही घटना प्रसंगाचे रेखाटन कादंबरीमध्ये केलेले दिसून येते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांविषयी केलेले कार्य, दलित पँथरचे कार्य, दलित संघटनामधील गटबाजी, फुटीर वृत्तीमुळे चळवळीचे झालेले नुकसान याविषयीचे चित्रण या कादंबरीमध्ये आलेले आहे.

**'शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील दलित चळवळ'** या प्रकरणाच्या अनुषंगाने अभ्यास केल्यानंतर असे लक्षात येते की, त्यांनी आपल्या 'भिन्नलिंगी',

'उपल्या' व 'हिंदू' या तीनही कादंबऱ्यांमधून दलित चळवळीची मांडणी केलेली आहे. त्यांनी या कादंबऱ्यामधून प्रामुख्याने 'दलित पँथर' या जहाल युवक संघटनेच्या वाटचालीचे चित्रण केलेले दिसून येते. शरणकुमार लिंबाळे हे पँथर चळवळीमधील कार्यकर्ते असल्यामुळे त्यांच्या कादंबरीत या चळवळीवरील प्रेम पहावयास मिळते. पँथरमधील युवकांचा सहभाग दर्शविण्यासाठी त्यांनी कादंबरीत कॉलेज जीवनापासूनची चळवळ रेखाटली आहे. त्यामधून युवकांमधील चळवळीविषयीची आक्रमकता दिसून येते. लेखकाने दलित चळवळीमध्ये असलेली रिपब्लिकन पक्षाविषयी नकारात्मकता कादंबरीत मांडली आहे. युवकांमध्ये या पक्षाविषयी राग व्यक्त झालेला दिसून येतो.

'दलित पँथर' चे चित्रण करताना लेखकाने पँथरची स्थापन, त्यांचे मोर्चे, आंदोलने, चळवळीमधील विविध प्रश्न, चळवळीतील गटबाजी, जातीयवाद अशा प्रश्नांचा शोध घेतला आहे. तसेच पँथर चळवळीने केलेल्या कार्यक्रमाचे चित्रणही विस्तृतपणे केलेले आढळते. त्यामध्ये प्रामुख्याने मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढा, भूमी बळकाव आंदोलन, काळा स्वातंत्र्य दिन अशा आंदोलनाचे चित्रण आलेले आहे. यामधून चळवळीविषयी व डॉ.बाबासाहेबांविषयीची आस्था दिसून येते. शरणकुमार लिंबाळे यांच्या 'भिन्नलिंगी', 'उपल्या' व 'हिंदू' या तीनही कादंबऱ्या दलित चळवळ या प्रमुख सूत्रामध्ये गुंफलेल्या दिसतात. या कादंबऱ्यामधून आंबेडकरोत्तर दलित चळवळीची जडण-घडण आपणास पहावयास मिळते.

प्रामुख्याने दलित चळवळीमध्ये आलेले साचलेपण? या प्रश्नाचा वेध घेऊन या तीन कादंबऱ्यांची निर्मिती झालेली दिसून येते. लेखकाने या तीनही कादंबऱ्यामधून चळवळ कशी फसत जाते याचे वास्तव मांडले आहे. काही प्रश्नाबाबत चळवळीला आलेले यश लेखक मांडत जातो. उदा.राखीव जागेचा प्रश्न, भूमी बळकाव आंदोलन. परंतु एकूणच कादंबऱ्यांचा आढावा घेतला तर चळवळीला अपयश आल्याचे चित्रण ठळक रूपात आल्याचे दिसून येते. असे असले तरी चळवळीतील नेत्यांची, कार्यकर्त्यांची खचून न जाण्याची मानसिकता कादंबरीत चित्रित झालेली दिसते.

पात्र, कथानक, घटनाप्रसंग आणि वातावरण या कादंबरीतील घटकांना अवाजवी महत्त्व न देता चळवळीची वैचारिकता व कार्यकर्त्यांची दिशाहिन भटकंती, यामुळे चळवळीचे फसत जाणे, याच्या मांडणीमुळे या कादंबऱ्यांचे एक वेगळे स्थान निर्माण झाले आहे.

या कादंबऱ्यातून मांडलेला विषय 'दलित पँथर' हा असला तरी त्यातील वैचारिकतेमुळे तो अधिक व्यापक झाला आहे. समाजामध्ये कार्यरत असणाऱ्या कोणत्याही चळवळीतील कार्यकर्त्यांची, नेत्याची हीच मानसिकता असू शकते याचे भान या कादंबऱ्यांमधून येते. एकूणच शरणकुमार लिंबाळे यांनी 'दलित पँथर'चे तटस्थपणे अवलोकन करून पँथर चळवळीचा सर्वांग आलेख मांडून चळवळीसाठी काही सूचनाही सांगितलेल्या दिसून येतात. उदा. 'चळवळीने लोकांचे प्रबोधन केले पाहिजे.' 'मानवी मूल्यांच्या आधारावरच चळवळी कराव्या.' 'दलितांचे प्रतिनिधी दलितांनीच निवडले पाहिजेत.' आपला उमेदवार निवडून देताना त्यांचे वैचारिक आणि भावनिक चारित्र्य तपासले पाहिजे.' अशा विविध सूचना कादंबऱ्यांमध्ये पहावयास मिळतात. त्याग शरणकुमार लिंबाळे यांची कादंबरी दलित चळवळीचा तटस्थपणे वेध घेते असे ‹ता येईल.

**'शरणकुमार लिंबाळे' यांच्या कादंबरीतील व्यक्तिरेखा'** र प्रकरणाच्या अनुषंगाने अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, 'भिन्नलिंगी', 'उप्रा' व हिंदू' या कादंबऱ्यातील व्यक्तिरेखा या विविध वृत्ती-प्रवृत्तीच्या आहेत. ‹तील अधिकाधिक व्यक्तिरेखा ह्या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या आहेत दलित तरूणांमधील चळवळीविषयक भावना या व्यक्तिरेखांमधून दिसून ‹ात. त्यांच्याद्वारे भारतीय समाजव्यवस्थेमधील सामाजिक वास्तव व दलित तरूणां‹ अंत:करणातील भावविश्वाचा उद्रेक चित्रित झालेला आहे. चळवळीसाठी नि:स्वार्थपणे कार्य करणारा परंतु आर्थिक परिस्थितीमुळे खचलेला राम 'भिन्नलिंगी'मध्ये ये‹. 'चेल्या' या व्यक्तिरेखेतून समाजाच्या संरक्षणासाठी तरूणामधील आक्रमकता व च‹वळीसाठी दिलेले बलिदान दिसते. 'सावंत'

एक ही आदर्श व वैचारिक कार्यकर्त्याची व्यक्तिरेखा आहे तर प्रा.कांबळे हे पांढरपेशी वृत्तीची दलित व्यक्तिरेखा आहे.

स्वत:च्या कर्तृत्त्वावर चळवळीचे नेतृत्त्व करीत मंत्रीपदापर्यंत जाऊन जनतेचे कार्य करणारा रोहिदास 'उपल्या' कादंबरीत येतो. 'मिलिंद' हा दलित पँथर मधील नेता विविध प्रश्नांसाठी मोर्चे, संप यामध्ये सक्रीय सहभाग घेताना दिसतो. विजय पगारे आपली नोकरी सांभाळून चळवळीचे काम करतो. परंतु तो घरच्या आर्थिक विवंचनेत अडकतो. तो चळवळीविषयी संभ्रम अवस्थेत सापडलेला पहावयास मिळतो. तर रमा बाबर चळवळीमध्ये काम करणारी धाडसी स्त्री आहे.

'हिंदू' मधील प्रा.बनसोडे हे नोकरीवरून काढून टाकल्यानंतर अन्यायाविरूद्ध लढण्यासाठी चळवळीत सामील होतात. भिमशक्ती संघटनेची स्थापना करून चळवळीला गती आणतात. जलसाकार तात्या कांबळे हे जलस्यामधून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार करतात, तर कबीर कांबळे व रोहीत कांबळे हे गावपातळीवरील चळवळीत काम करणारे कार्यकर्ते आहेत

याशिवाय चळवळीसाठी मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्तिरेखाही कांदबरीमधून न येतात. 'प्रा.राहूल बनसोडे' हे चळवळ भावनेवर चालत नाही तर चळवळीला आये लॉजी व विचारांची गरज असते असे मार्गदर्शन करतात. 'जयश्री' ही चळवळीत स्त्रियांचा हभाग वाढविण्याचे व चळवळ सर्वव्यापी करण्याचे विचा व्यक्त करते. तात्या कांबळे लस्याद्वारे लोकांना अन्यायाची जाणीव करून देतात व अंधश्रद्धेतून बाहेर ढण्याविषयी सांगतात तर रोहीत कांबळे व कबीर कांबळे हे धर्मांतर व समाज परिवर्तन याविषयी मार्गदर्शन करताना दिसतात.

शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबऱ्यामध्ये स्त्री व्यक्तिरेखांना फरसा वाव दिसत नाही असे असले तरी काही स्त्री व्यक्तिरेखा ठळक स्वरूपात पहावयास मिळतात. काही स्त्रिया सोशिक आहेत तर काही अन्यायाविरूद्ध पेटून उठतात. सुमी, सरजा, सविता कांबळे या सोशिक व्यक्तिरेखा आहेत तर जयश्री, नंदा गायकवाड, रमा बाबर या

स्त्रिया अन्यायाविरूद्ध पेटून उठतात. या व्यक्तिरेखांचा लक्षणीय विशेष म्हणजे कोणतीही व्यक्ती आदर्श, सर्वगुणसंपन्न असलेली दिसून येत नाही. त्या त्या व्यक्तीमध्ये असलेल्या गुण-दोषांसह ती कादंबरीत चित्रित होताना दिसते. शिवाय विशिष्ट एक व्यक्ती नायकाचे स्थान घेऊन कादंबरीमध्ये केंद्रस्थानी येत नाही त्यामुळे कोणा एका व्यक्तिरेखेच्या चित्रणात कादंबरी अधिक न रमता, खुलवून न मांडता तटस्थपणे ती व्यक्त होत जाते.

**'शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीची भाषाशैली'** अभ्यासल्यानंतर हे जाणवते की, त्यांच्या तीनही कादंबरीतून एकाच प्रकारचे निवेदन येत नाही, प्रथम पुरूषी, तृतीय पुरूषी अशा दोन्ही निवेदनाचा उपयोग त्यांनी केला आहे. लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचे भाषिक अनुभव व त्याच्या भोवतीचे सामाजिक वातावरण याचा प्रभाव कादंबरीतील भाषेवर जाणवतो. लेखक हा दलित चळवळीतील प्रत्यक्ष कार्यकर्ता असल्यामुळे व चळवळ जवळून अनुभवल्यामुळे कार्यकर्त्याकडून बोलली जाणारी भाषा कादंबरीत येते. उदा. मोर्चा, आंदोलने, उपोषण, निवेदन, पत्रकं अशा शब्दांच्या योजनेमुळे चळवळीची भाषा कादंबरीत आलेली दिसते. याशिवाय प्रत्येक पात्राच्या व्यक्तिमत्त्वानुसार त्यांच्या तोंडी त्याची स्वत:ची भाषा लेखकाने योजिल्यामुळे कादंबरीतील संवादरचना जिवंत स्वरूपात आलेली दिसते. उदा. 'तिच्या मायला त्येनला जैभीम केल्यावर जैभीमच करत न्हैत' आलीय का मस्ती म्हणावं! बाबायसायबांचं खाऊन? (भिन्नलिंगी) मनू व चेल्या या दोन कार्यकर्त्यांमधील हा संवाद आहे. 'उपल्या' मधील मंज्याचा पी.ए. व माणिकचंद यांच्या संवादातही वेगळी भाषा पहावयास मिळते.

उदा. 'अहो, मंत्री म्हटल्यावर पुढच्याची गांड फाटते. तो पैसे आणून देणारच...

'ही रिस्क आहे...'

'आयुष्यात एकदा तरी रिस्क घेतली पाहिजे...'

या संवादातून विविध भाषेत रूपे व इंग्रजी शब्दाचा सहजतेने केलेला वापर दिसून येतो. तसेच पात्रागणिक भाषेचे वेगळेपणही जाणवते. 'हिंदू' कादंबरीतही

पात्राच्या व्यक्तिमत्त्वानुसार भाषेचा वापर केला आहे. गावातील पाटील, त्याची सून व पत्नी यामधील संवाद...

उदा. 'महारवाडयात का गेली होतीस? रामभाऊ

"मला माहीत नाही" सोनाली

सोनाली काय झालय गं?" काशीबाई या संवादातून मगुर कडक भाषा व शब्दामधून प्रसंगाचे गांभीर्य जाणवते. तसेच व्यक्तिरेखाही गडद होते. अशाप्रकारे व्यक्तिरेखानुसार विविध भाषेचा वापर केलेला दिसून येतो. अशा विविध भाषिक अनुभूतीमुळे कादंबऱ्या वास्तवाभिमूख बनल्या आहेत. सामाजिक वातावरण चित्रणामुळे व उपदेशपर लेखन यामधून कार्यकर्त्यांना सल्ला देण्याचेही कार्य लेखकाने केले आहे.

शरणकुमार लिंबाळे यांनी 'दलित चळवळ' ही मध्यवर्ती सूत्र ठेवून चळवळीची सामाजिक, राजकीय बाजू मांडली आहे. तसेच कार्यकर्त्यांच्या मानसिकतेचेही प्रभावी चित्रण केले आहे. त्यांनी दलितांच्या आर्थिक, सामाजिक स्थितीचेही चित्रण केले आहे. सामाजिक आकलनात्मक मांडणी व भाषेची सहजता यामुळे या कादंबऱ्यात भाषेविषयीचा जडपणा जाणवत नाही. विषय अभिव्यक्तीला आवश्यक असणारा त्यांचा अनुभव प्रामाणिक आहे. पण या कादंबऱ्यामध्ये स्त्रियांकडे उपभोग्य वस्तू म्हणून पाहण्याऱ्या पुरूषी संस्कृतीचे चित्रण प्रकर्षाने जाणवते. काही काही ठिकाणी जाणीवपूर्वक रंगेल चित्रण आलेले जाणवते तर वेश्या जीवनाविषयीचे चित्रण तीनही कादंबरीत आलेले आहे. यावरून लेखकाचा वेश्यांकडेही पाहण्याचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. एकूणच दलित जीवन व दलित चळवळ यांची सर्वांगाने मांडणी लेखकाने केल्याचे दिसून येते.

एकंदरीत 'शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीतील दलित चळवळीचे चित्रण' अभ्यासताना पुढील निष्कर्ष नोंदविता येतात...

१. शरणकुमार लिंबाळे यांनी प्रामुख्याने दलित पँथर चळवळीचे चित्रण कादंबऱ्यांमध्ये केलेले आहे.

२. दलित चळवळीमधील दलित पँथरची स्थापना, पँथर स्थापनेमागील कारणे, पँथरने केलेली भूमीबळकाव आंदोलन, सुशिक्षित बेकारीविरूद्धचे आंदोलन व नामांतरचे आंदोलन याचे चित्रण कादंबरीत येते.

३. शरणकुमार लिंबाळे यांनी कादंबऱ्यामधून दलित चळवळीचे मानसशास्त्र उलगडून दाखविले आहे.

४. सामाजिक स्तरावर दलित चळवळीला आलेले यश आणि राजकीय स्तरावरील दलित चळवळीचे अपशय कादंबरीत विविध कारणांसह आलेले आहे.

५. कादंबरीमधील भाषा ही चळवळीच्या अनुषंगाने येते त्यामध्ये ग्रामीण बोली भाषेचाही अवलंब दिसतो.

६. कादंबरीतील व्यक्तिरेखा चळवळीच्या अनुषंगाने येतात त्यामुळे कादंबरीत कार्यकर्ते व दलित नेते यांच्याच व्यक्तिरेखा अधिक येताना दिसतात.

७. कादंबरीतील व्यक्तिरेखांचे चित्रण वैयक्तिक पातळीवर न येता सामाजिक पातळीवरील चित्रण पहावयास मिळते.

८. 'दलित पँथर' चळवळीमध्ये काम करणाऱ्या तरूणांच्या भाषणाची वेगळी लकब शरणकुमार लिंबाळे यांनी कादंबऱ्यामध्ये वापरली आहे.

९. कोणतीही चळवळ ही भावनेवर न चालता विशिष्ट वैचारिक भूमिकेवर चालते, विकसित होते व यशस्वी होते, हे शरणकुमार लिंबाळे यांच्या कादंबरीचे मुख्य सूत्र म्हणता येते.